झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-१/झोपुआ/७७ दाते/ /२०१९
दिनांक : ०२।०२।१९

231/02.02-19

## "झोपडपट्टी पुनर्वसन आदेश"

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता **'उपरोक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१ दि. ३०/६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ०१/१२/२००५ रोजी अंतिमतः प्रसिध्द करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विकसक यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.२५/०२/२०१० रोजी प्रस्ताव दाखल केलेला आहे. प्रस्तावाच्या अनुषंगाने उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी स.नं.७७ (पै.) सि.स.नं.२०७२ (पै.), सिध्दार्थ नगर, दाते बस स्टॉप, सहकार नगर, पर्वती, पुणे या जागेवरील झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार झोपडीधारकांची पात्रता निश्चित केलेली आहे. उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी दि. ०५/०५/२०११ अन्वये सादर केलेल्या परिशिष्ट-२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर जमिनीवर एकूण २४९ झोपडीधारकांपैकी असून त्यापैकी पात्र निवासी १६४, पात्र बिगर निवासी ०३ व संयुक्त ०१ असे एकुण १६८ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत. १६८ झोपडीधारकांपैकी १५९ झोपडीधारकांनी म्हणजेच एकूण ९४.६४% झोपडीधारकांनी विकसक यांना पुनर्वसन योजनेसाठी संमती दिलेली आहे. तसेच सदर योजनेच्या पुरवणी पात्रता यादी क्र.१ मध्ये २३ झोपडीधारक व पुरवणी पात्रता यादी क्र.२ मध्ये १४ झोपडीधारक पात्र ठरले आहेत. ;

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने (एकुण क्षेत्र ४८०७.८२ चौ.मी.) व त्यापैकी २६८७.५० चौ.मी. क्षेत्र दि.१६/०४/१९९२ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-१ पुरवणी पान क्र.७७७ वर घोषित झोपडपट्टी म्हणुन प्रसिध्द करणेत आलेले आहे. उपरोक्त नमुद एकुण क्षेत्रापैकी २१२०.३२ चौ.मी. घोषित नसलेमुळे सदर क्षेत्र घोषित उक्त कलमा खाली करणे गरजेचे आहे. तसा उर्वरीत अघोषित क्षेत्राचा झोपडपट्टी सदृश्य अहवाल क्षेत्रीय अधिकारी, सहकार नगर क्षेत्रीय कार्यालय पुणे मनपा, पुणे यांनी दि. १४/०९/२०१० रोजी सादर केला आहे, तसेच तत्कालीन उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपुप्रा., पुणे यांचेकडील दि.२७/०९/२०१० रोजीचा उर्वरीत अघोषित क्षेत्राचा स्थळपाहणी अहवाल

सादर केला आहे. सदर दोन्ही अहवालानुसार सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनिय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे;

आणि ज्याअर्थी; महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मुलन व पुर्नविकास) सुधारित अधिनियम २०१८ चे तरतूदीनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१ दि.३०/०६/२००५ व मुळ अधिनियमातील ३(क) चे तरतूदीनुसार अनुसूचीमध्ये नमूद मिळकतीचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेचे नियोजीले आहे. अनुसुचीमधील नमुद मिळकत शासकीय मालकीची असलेने झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकरीता मा.जिल्हाधिकारी पुणे जिल्हा, पुणे यांचेकडुन दि. ११/०७/२०१७ रोजी ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. त्यामुळे अनुसुचीमध्ये निर्दिष्ठ क्षेत्र उक्त कलमाखाली झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी पांडूरंग पोले, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) सुधारित अधिनियम २०१८ चे कलम ३ क (१) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये अनुसूचित नमुद केलेले क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे. सदरचे घोषित पुनर्वसन क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) सुधारित अधिनियम २०१८ चे कलम ३ क (१) व झोपुप्रा पुणे चे नियमावलीतील SR १९(१) मधील तरतूदीनुसार विकसित केले जाईल.

सदरच्या आदेशामुळे बाधित होणा-या कोणत्याही व्यक्तिस आदेश प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) सुधारित अधिनियम २०१८ चे कलम ३ क (२) मधील तरतूदीनुसार शिखर तक्रार निवारण समिती, ४ था मजला, झो.पु.प्रा. कार्यालय, प्रो. अनंत कणेकर मार्ग, बांद्रा (पू.) मुंबई ११ अपील दाखल करता येईल आणि शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

**<u>अनुसूची</u>**

| जमिनीचा तपशील | क्षेत्र ( चौ. मी.) | चतु:सिमा (घोषित नकाशा व मोजणी नकाशाप्रमाणे) |
|---|---|---|
| स.नं.७७ (पै.) सि.स.नं.२०७२ (पै.), सिध्दार्थ नगर, दाते बस स्टॉप, सहकार नगर, पर्वती, पुणे | २१२०.३२ चौ. मी. | **पुर्वेस** - रस्ता |
| | | **पश्चिमेस** - लागु सि.स.नं.२०६८ |
| | | **उत्तरेस** - लागु सि.स.नं.२०७३ (पै.) व सि.स.नं.२०७२ (पै.) |
| | | **दक्षिणेस** - लागु सि.स.नं.२०७२ (पै.) |

सदरचा आदेश हा माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आला.

(पांडूरंग पोले)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक -02/02/२०१९